## नि.क्र.५ खालील आदेश

(दि.२७.०२.२०१७ रोजी पारीत)

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (येथुन पुढे 'संहिता' असे संबोधले आहे) आदेश ३९ नियम १,२ प्रमाणे प्रतिवादी नं.१ ते ५ यांनी वादीच्या दावा कलम १अ व १ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये हरकत अडथळा करून नये, म्हणून मनाई हुकूम मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, जिल्हा तुकडी सांगली, तालुका व पोटतुकडी जतपैकी, मौजे रेवनाळ येथील, भुमापन गट नं.७८३/१ याचे एकूण क्षेत्र ८हे.५० आर., आकार रु.१.४४ पैसे, पैकी १ हे.८४ आर क्षेत्राची मिळकत तसेच जिल्हा तुकडी सांगली, तालुका व पोटतुकडी जतपैकी, मौजे रेवनाळ येथील, भुमापन गट नं.७८३/३ याचे एकूण क्षेत्र १८हे.५९ आर. पो.ख.०.१४ आर आकार रु.१०.५० पैकी ८ हे.१६ आर. क्षेत्राची मिळकत (येथुन पुढे **'दावा मिळकत १अ व १ब'** असे संबोधले आहे). सदर दावा मिळकती या मुळच्या आप्पा .. बंडगर यांच्या मालकीच्या होत्या. सदरच्या दावा मिळकतींचे वादी व त्यांच्या वारसामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ८५ नुसार तहसिलदार, जत यांचेसमोर वाटप दि.०२/०९/२००० रोजी झाले आहे.

सदरच्या वाटपाप्रमाणे माईबाई रामा गणाचारी हिने तिचे वाटयास आलेली गट नं.७८३/३ मधील ३हे.१६ आर जमीन दि.०६/०२/२०... रोजी प्रस्तूत वादीस नोंदणीकृत वाटपपत्राने दिली आहे. तसेच गट नं.७८३/३ मधील बयाबाईच्या वाटयास आलेली १ हेक्टर जमीन दि.०९/११/२००१ रोजीच्या नोंदणीकृत मृत्यूपत्राने वादीस दिली. त्याप्रमाणे वादी हा दावा मिळकत १ब चा मालक झाला आहे.

प्रतिवादी नं.१ ने हजर होवून त्यांचे म्हणणे नि.नं.३२ ला दिले आहे. प्रतिवादी नं.२ व ४ यांनी त्यांना समन्सची बजावणी होवूनही याकामी हजर न राहील्याने, त्यांचे म्हणण्याशिवाय चौकशी सुरु झाली. दि.०२/११/२०१६ रोजी वादीने प्रतिवादी नं.३ व ५ यांचेसाठी पुन्हा समन्सची

पुर्तता न केल्याने संहिताचे आदेश ९ नियम ५ अन्वये  त्यांचेविरुध्दचा दावा काढून टाकणेत आला.

प्रतिवादी नं.१ यांची त्यांचे म्हणणे नि.नं.३२ मध्ये वादीच्या अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी नं.१ यांचे असे कथन आहे की, प्रतीवादी नं.१ ची पत्नी तानूबाई हिने स्वतःसाठी व मुलगा शहाजी याचेकरीता रेदीमु. नं. ४०/१९८४ दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल ०४/१०/१९८६ रोजी लागला असून त्यामध्ये प्रतिवादी नं.१ यास ३/२४, बयाबाई आप्पा बंडगर  हिस ९/२४ व माईबाई गणाचारी, कामाबाई गणाचारी, हौसाबाई खांडेकर, साळूबाई मोरे, तानुबाई वाघमोडे, नर्मदा व्हनमाने यांना प्रत्येकी १/२४ असा हिस्सा व तानुबाई आबा बंडगर व शहाजी आबा बंडगर यांना एकत्रित ६/२४ हिस्सा ठरवून दिला आहे. सदर दाव्यातील हुकूमनाम्यावरू प्रतिवादी नं.१ ने दरखास्त नं.४१/१९८७ दाखल केली होती व त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे वाटप कामासाठी पाठविली होती. त्यानुसार वाटप तक्ता तयार झाला. सदरच्या वाटप तक्त्याच्या विरुध्द तानूबाई बंडगर हिने प्रांतसो व त्यानंतर त्याविरुध्द जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे वाटप अपिल नं.१/९१ चे दाखल केले. पुन्हा त्यावर नाराज होवून मा. आयुक्त, पुणे यांचेकडे अपिल नं.५२१/९५ दि.०६/१०/१९९५ रोजी दाखल केले व त्यावर स्थगिती मिळवली. वादीने मायाबाई, कामाबाई व बयाबाई यांची दिशाभूल करून दावा मिळकत ७८३/१, २, ३ च्या वाटपासाठी तहसिलदार, जत यांचेकडे दि.११/०३/२००० रोजी अर्ज केला. त्याप्रमाणे **फेरफार नं.४६४, ४६७** ने त्याची अभिलेखात नोंद झाली. त्यावर प्रतिवादी नं.१ यांनी अपिल नं.६६/२००८ करून दि.२६/०३/२००९ रोजी सदर फेरफार नं.४६४ व ४६७ च्या नोंदी रद्द करण्यात आल्या. त्यापुर्वी सदर वादीने बयाबाई आप्पा बंडगर हिचेकडून दि.०९/११/२००१ रोजी मृत्यूपत्र करुन घेतले व त्याच्या नोंदीसाठी दि.०६/०२२००४ रोजी अर्ज दिला. ती नोंद फे.नं.५७७ ने ग्राहय धरण्यात आली. सदरच्या नोंदीबाबत तानुबाई बंडगर हिने तक्रार दिलेनंतर रजि.नं.१३९/२००४ चालून सध्या अपिल नं.५२१/९५ अजून प्रलंबित असून या मिळकतीबाबत स्थगितीचा हुकूम असल्याने मृत्युपत्राची नोंद केलेस अधिक गुंतागुंत होणार

आहे. सदरचे मृत्यूपत्र कोर्टातून शाबीत करुन घेणे आवश्यक आहे, असे म्हणून फे.नं.५७७ ची नोंद रद्द केली आहे. वाटप क्र.एसआर–२७३/२००० हे क्र.आरटीएस/अपिल नं.६६/२००४ ने रद्द केले आहे. मायाबाई रामा गणाचारी हिस गट नं.७८३/३ मध्ये ३ हे.१६ आरची मालकी येत नाही. कारण रेदिमु नं.४०/८४ प्रमाणे तिला १/२४ हिस्सा मिळाला आहे. त्यापेक्षा जास्त हिस्सा तीला येत नाही. तसेच बयाबाईस देखील ९/२४ पेक्षा जास्त हिस्सा येत नसलयाने वादीस मायाबाई गणाचारी हिने केलेल्या वाटपपत्राने व बयाबाईने केलेल्या मृत्युपत्राने मालकी हक्क वा आधिकार येत नाहीत. तसेच मायाबाई/बयाबाई यांचा हिस्सा तुटक झाला नसल्याने त्यांनाच मालकी नसल्याने वादीला मालकी येत नाही. तसेच वादी किंवा प्रतिवादी यांना नं.५२१/९५ रोजीचा आयुक्त, पुणे यांचा स्थगिती आदेश असल्याने कोणतेही रेदिमु नं.४०/८७ बाबत वाटप करता येणार नाही. सदरच्या दस्तांनी वादीस मालकी येत नाही. त्यामुळे वादी मालक या नात्याने सदर मिळकत ही कब्जेवहीवाटीस असल्याचा प्रश्नच येत नाही. सदर वादीने मुलकी अधिका–यांना हाताशी धरून एकदा फे.नं.५७७ नामंजूर झाला असूनही पुन्हा अर्ज करून मृत्युपत्राची नोंद फे.नं.१०५२ ने करून घेतली आहे. सदरबाबत अपिल नं.२०७/२०१३ दाखल असून ते प्रलंबित आहे. तसेच दावा मिळकत ही प्रतिवादी नं.१ यांचे कब्जात आहे. वादीचा कब्जाच नसल्याने हरकत अडथळा करण्याचा प्रश्नच येत नाही. सबब तुर्तातुर्त अर्ज नामंजूर करण्यात यावा.

६. वादीतर्फे सुविद्य विधिज्ञ श्री. करजगार, प्रतिवादी नं.१ तर्फे सुविद्य विधिज्ञ श्री. टी. एस. शेख यांचा युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रे व अभिलेखाचे अवलोकन केले. यावरून माझे विचारार्थ निघालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणेमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदवीत आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
| --- | --- | --- |
| १. | वादीस सकृतदर्शनी केस आहे असे वादी शाबीत करतात काय ? | – |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे असे वादी शाबीत करतात काय ? | – |
| ३. | मनाई हुकुम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे हे वादी शाबीत करतात काय ? | – |
| ४. | काय आदेश ? | – ***अर्ज करण्यात येतो.*** |

## कारणेमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबतः**

७. वरील ३ मुद्दे एकमेकांशी सलग्न असल्यामुळे त्यांची कारणेमिमांसा एकत्रित करण्यात आली आहे.

८. वादीने त्यांचे कथनाचे पुष्ठर्थ स्वतःचे शपथपत्र नि.नं. ला दाखल केले आहे. तसेच वादीने फेरीस्त नि.नं.३ सोबत गट नं. ७८३/१, ७८३/२ व ७८३/३ चे सातबारा उतारे, मा. तहसिलदार, जत यांचे वाटप/एसआर/२७३/२००० च्या आदेशाची नक्कल, दि.०६/०२/२००८ रोजीच्या वाटपाची मुळ प्रत, दि.०९/११/२००१ रोजी बयाबाई बंडगर यांनी दुय्यम निबंधकसो, जत यांचे कार्यालयात नोंदविलेले मृत्यूपत्र, दावा मिळकतीबाबत वादीच्या नावांचे उतारे, तसेच नि.नं.४५ सोबत बयाबाई बंडगर, माईबाई गणाचारी, शाबूबाई मोटे यांनी केलेल्या वाटप अर्जाची नक्कल, तहसिलदार जत यांनी ६१४/२००० चे कामी पाठविलेल्या नोटीसीची मुळप्रत....... तहसिलदार, जत यांनी वाटप/एसआर/२७३/२००० चे कामी दि.०२/०९/२००० रोजी दिलेल्या आदेशाची प्रत, आबा आप्पा बंडगर यांनी मंडल अधिकारी, शेगांव यांचेसमोर दि.२३/७/२००४ रोजी दिलेल्या जबाबाची सही शिक्याची नक्कल, वादीने प्रतिवादी वि. जिल्हाधिकारी, सांगली यांचे कोर्टात दाखल केल्या अपील

नं.५७७/१५ ची स्थळप्रत व त्यावील आदेशाची नक्कल अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच वादीने नि.नं.६५ सोबत वादीने प्रतिवादी विरुध्द पुणे येथील मा. अप्पर आयुक्त यांचे कोर्टात दाखल केलेल्या रिव्हीजन अर्जाची व स्थगिती अर्जाची स्थळप्रत, अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. त्याचबरोबर वादीने नि.नं.६९ सोबत फे.नं.६९४ चा उतारा, मे.पांडुरंग दांडेकर यांचेकडून पाईपलाईनचे सामान खरेदीबाबत पावती, संतोष इलेक्ट्रीकल्स स्पेअर्स यांचेकडील पावती, गुरुदत्त इलेक्ट्रीकल्स स्पेअर्स यांचेकडील पावती, दावा मिळकतीच्या कर भरल्याबाबतच्या पावत्या, मा. अप्पर जिल्हाधिकारी सांगली यांनी ४०६/२०१३ मधील दिलेल्या निकालाची समज, मा. अप्पर आयुक्त, पुणे विभाग पुणे यांनी आरटीएस/सांगली/५३८/२०१४ मध्ये दिलेल्या आदेशाची सही शिक्याची नक्कल, फे.नं.४६३, ४६४ व ४६७ चा उतारा, नि.नं.७२ सोबत फे.नं.८१२ ची सही शिक्याची नक्कल, मा. अप्पर जिल्हाधिकारी सांगली यांनी आरटीएस/दुसरे अपिल/४०६/२०१३ मधील दिलेल्या आदेशाची नक्कल अशी कागदपत्रे दाखल केली आहेत.

प्रतिवादी नं.१ स्वतःचे शपथपत्र नि.नं..... ला दाखल करून नि.नं.३७ सोबत आरटीएस/अपिल/नं.२०७/२०१३ च्या निकालाच्या समजची छायांकित प्रत व निकालपत्राची नक्कल, नि.नं.५१ कडे रेदिमु नं.४०/८४ मधील निकालाची छायांकित प्रत, रेग्युलर दरखास्त नं.४१/८७ ची छायांकित प्रत, आरटीएस/एसजीएल/५२१/९५ मधील 'स्टेटस को' च्या हुकूमाची प्रत, फे.नं.४६४ व ४६७ चे उतारे, आरटीएस/अपील/६६/२००८ च्या निकालाची प्रत, फे.नं.५७७ चा उतारा, तक्रार नं.१३९/२००४ च्या निकालाची प्रत, क्र.ह.नो/वशी/४६६/२०१३ मधील हुकूमाची प्रत, नि.नं.५३ सोबत फे.नं.३९ चा उतारा, नि.नं.५९ सोबत प्रतिवादी नं.१ यांनी बाजीराव आबा बंडगर यांना लिहून दिलेले कुलमुखत्यारपत्र, मा. अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील अपील नं.५७७/१५ च्या निकालाची प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत.

वादीचे सुविद्य विधीज्ञ श्री. करजगार यांनी युक्तीवादात सांगितले की, दावा कलम १अ व १ब मधील नमूद दावा मिळकतीतील मायाबाई गणाचारी हिने तिचे वाटयास आलेली ३ हेक्टर १६

आर ही भुमापन गट नं.७८३/३ मधील जमीन ही दि.०६/०२/२००८ रोजी नोंदणीकृत वाटपपत्राने प्रस्तूत वादीच्या हिश्यास दिली व बयाबाई बंडगर हिने गट नं.७८३/३ मधील १हेक्टर जमीन दिनांक ०९/११/२००१ रोजी मृत्युपत्राने प्रस्तूत वादीस दिली. अशा त–हेने गट नं. ७८३/३ म्हणजेच दावा कलम १ब मधील मिळकतीचा वादी पूर्ण मालक झाले आहेत. तसेच त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, बयाबाई बंडगर, माईबाई गणाचारी, शाबूबाई मोटे यांनी तहसिलदार जत, यांचेकडे केलेल्या दि. १५/०३/२००० च्या दावा मिळकत गट नं.७८३/१, ७८३/२ व ७८३/३ मधील वाटप अर्जानुसार (नि.नं.४६) मे. तहसिलदार, जत यांनी वाटपतक्ता तयार करून त्यावर आदेश पारीत केलेला आहे. त्यामध्ये सर्व संबंधीत लोकांनी सहया केलेल्या आहेत. त्याची नोंद फे.नं.४६४ व ४६७ नुसार अभिलेखावर नोंदविली आहे. तसेच त्यावेळी मे. तहसिलदार यांनी चौकशीसुध्दा केलेली आहे. त्यामुळे त्यास पुराव्या कायदयाचे गृहीतक लागू होते. सदरच्या आदेशाविरुध्द प्रतिवादीने कोणत्याही न्यायालयाकडे दाद मागितली नाही. प्रतिवादीने फक्त फेरफार नं.४६४ व ४६३ बाबत दाद मागितली आहे. तसेच वादीने बयाबाई हिने करून दिलेले मृत्यूपत्र नोंदीकरीता केलेला अर्ज फे.नं.५७७ अन्वये नोंद करण्यात आला. परंतू सदरचे मृत्युपत्र बेकायदेशीर असल्याचे कुठेही नमूद केलेले नाही. त्यामुळे सदरचे मृत्यूपत्राप्रमाणे वादीस आलेला हक्क अबाधीत राहतो. त्यास तानूबाई बंडगर हिने तक्रार केस नं.१३९/२००४ ही चालून आरटीएस/एसजीएल/५२१/९५ प्रमाणे स्थगिती हुकूम मिळवून फे.नं.५७७ ची नोंद रद्द केली आहे. वादीचे नांव दावा अर्ज कलम १अ आणि १बच्या मिळकतीच्या महसूल अभिलेखी लागलेले असून वादी हा सदरच्या मिळकती या वादीच्या कब्जेवहीवाटीच्या आहेत. त्यामध्ये वादी वेळोवेळी वेगवेगळी पिके घेत असतो. सध्या दावा मिळकतीमध्ये शाळू व उसाचे पिक आहे. दि. २/३/२०१५ रोजी यातील प्रतिवादीनी वादीच्या शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करण्याचा प्रयत्न केला व यापुढेही अशी हरकत व अडथळा केल्यास वादीचे कायमस्वरुपी व अपरिमीत पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीने वादीच्या शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा करू नये अशी ताकीद देवविण्यात यावी.

वादीच्या विधीज्ञांनी असाही युक्तीवाद केला की, मे. तहसिलदार यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनयम कलम ८५ नुसार वाटप करण्याचे पूर्ण अधिकार असून त्याप्रमाणे केलेले वाटप हे वैध व कायदेशीरच असते.

प्रतिवादीचे विधीज्ञ श्री. टी.एस. शेख यांनी त्यांचे युक्तीवादात सांगितले की, मे.दिवाणी न्यायालांनी रेदीमु नं.४०/८४ या तानुबाई हिने दाखल केलेल्या दाव्यामध्ये दि.०४/१०/१९८६ रोजी निकाल दिलेला आहे. सदर निकालाप्रमाणे प्रतिवादी नं.१ यास ३/२४, बयाबाई आप्पा बंडगर हिस ९/२४ व माईबाई गणाचारी, कामाबाई गणाचारी, हौसाबाई खांडेकर, साळूबाई मोरे, तानुबाई वाघमोडे, नर्मदा व्हनमाने यांना प्रत्येकी १/२४ असा हिस्सा व तानुबाई आबा बंडगर व शहाजी आबा बंडगर यांना एकत्रित ६/२४ हिस्सा ठरवून दिलेला आहे. मे. तहसिलदार, जत यांना सदर मे. दिवाणी न्यायालाच्या आदेशाचे बाहेर जावून वाटप करण्याचा अधिकार नाही. तसेच सदर वाटपामध्ये कायदेशीर वारसाना दिलेले हिस्से हे कायदेशीर नसून ते प्रतिवादी नं.१ वर बंधनकारक नाहीत. तसेच सदर हुकूमनाम्यावरून प्रतिवादी नं.१ ने दाखल केलेल्या दरखास्त नं.४१/१९८७ नुसार वाटप तक्ता तयार झाला. सदरच्या वाटप तक्त्याच्या विरुध्द तानूबाई बंडगर हिने प्रांतसो व त्यानंतर त्याविरुध्द जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे वाटप अपिल नं.१/९१ चे दाखल केले. पुन्हा त्यावर नाराज होवून मा. आयुक्त, पुणे यांचेकडे अपिल नं.५२१/९५ दि.०६/१०/१९९५ रोजी दाखल केले व त्यावर स्थगिती अर्ज देवून जैसे थे आदेश मिळविला आहे व ते अपिल सध्या प्रलंबित आहे. तसेच सदर मे. तहसिलदार यांचेकडील झालेल्या वाटपाचे आदेशानुसार झालेले फे.नं.४६४ व ४६७ हेदेखील आरटीएस/अपिल/६६/२००८ ने रद्द केलेले आहे. तसेच बयाबाई बंडगर हिने केलेल्या मृत्युपत्र नोंदीबाबत झालेला फे.नं.५७७ देखिल आरटीएस/एसजीएल/५२१/९५ नुसार रद्द झालेला आहे. त्यानंतर वादीने अपिल न करता पुन्हा दुस–यांदा मृत्युपत्र नोंदीसाठी केलेला अर्ज मंजूर केला व त्याची नोंद फे.नं.१०५२ ने घेण्यात आली. सदर फे.नं.१०५२ विरुध्द प्रतिवादी नं.१ ने आरटीएस/अपिल/ २०७/२०१३ दाखल केले असून ते अद्याप प्रलंबित आहे. तसेच दावा मिळकतीचा कब्जा हा

आप्पाजी रखमाजी बंडगर यांचे मृत्यूपासून आजतागायत प्रतिवादी नं.१कडे आहे. तसेच वादीकडे दावा मिळकतीचा कब्जाच नसल्याने प्रतिवादीने हरकत अडथळा करणेचा प्रश्नच उद्भवत नाही. वादी हा स्वच्छ हाताने कोर्टात आलेला नाही. वादी स्वतःचे नावाच्या नोंद अधिकार अभिलेखातील नावाचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावी.

वादीने प्रस्तुतचा दावा हा फक्त निरंतर मनाई हुकूमाकरीता केला आहे. त्यामुळे वादीस तात्पुरता मनाई हुकूम देताना वाद मिळकत ही अस्तित्वात असून ती त्यांच्या ताब्यात आहे हे प्रथमदर्शनी सिध्द करतात किंवा नाही हे पाहणे जरुरीचे आहे. कोणताही मनाई हुकूम देत असताना वाद मिळकतीचे निश्चितपणे वर्णन व स्थान असणे जरुरीचे असते व तसे ते हुकूम मागणा–या व्यक्तीने सिध्द करावयास पाहीजे. निश्चित स्थान व वर्णन नसल्यास गोंधळाची परिस्थिती निर्माण होवून मनाई हुकूमाची अंमलबजावणी करता येणार नाही.

प्रतिवादी क्र.१ ने या अर्जास ज्या मुद्यावर विरोध केला आहे, त्यामधील सर्वात पहिला महत्वाचा मुद्दा म्हणजे दावा मिळकतीबाबत मे. न्यायालयाने रेदिमु नं.४०/८४ बाबत दिलेल्या हुकूमनामापेक्षा जादाचा हिस्सा माईबाई व बयाबाई यांना प्राप्त होत नाही. तसेच मे. दिवाणी न्यायालयाचा हुकूमनाामा दावा मिळकतीच्या वाटपाबाबत असताना तहसिलदार जत यांना सदर मिळकतीचे वाटप करता येणार नाही. प्रतिवादी क्र.१ ने असाही मुद्दा उपस्थित केला आहे की, जमीन गट नं.७८३/१,७८३/२,७८३/३ या मिळकतींच्या वाटपाबाबत झालेला फे.न.४६४ व ४६७ हा आरटीएस/अपिल/६६/२००८ ने व बयाबाई बंडगर हिने केलेल्या मृत्युपत्र नोंदीबाबत झालेला फे.नं.५७७ हा आरटीएस/एसजीएल/५२१/९५ नुसार रद्द केलेले आहेत. तसेच वादीने दुस–यांदा दिलेल्या मृत्युपत्र नोंदीबाबतच्या अर्जावरून तयार झालेला फे.नं.१०५२ हा देखील मे.अप्पर आयुक्त, पुणे यांचेकडे प्रलंबित आहे. अशाप्रकारे मायाबाई व बयाबाई यांनाच दावा मिळकतींची कायदेशीर मालकी नसल्याने वाटपाने व मृत्युपत्राने मालकी येण्याचा प्रश्न येत नाही.

प्रतिवादीने दावा मिळकतीवर स्वतःचा कब्जा सांगितलेला असून असून त्याकामी त्यांनी नि.नं.५३ फेरीस्तसोबत फे.नं.३९ ची छायांकीत प्रत दाखल केली आहे. सदर फे.न.३९ चे अवलोकन केले असता मयत आप्पा रखमाजी बंडगर यांचे मृत्यूपश्चात वारस म्हणून आबा आप्पा बंडगर, मायाबाई रामा गणाचारी, कामाबाई रामा गणाचारी, हौसाबाई बाबू खांडेकर, साळुबाई रामा मोटे, तानुबाई रंगा वाघमोडे, नर्मदा केराप्पा व्हनमाने, बयाबाई आप्पा बंडगर यांची वारस म्हणून नोंद झालेली दिसते. परंतू सदर फेरफारवरून दावा मिळकतीवर प्रतिवादी नं.१ चा कब्जा आहे हे दाखविणेसाठी पुरेसा नाही. प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेल्या इतर कागदपत्रांमध्ये फे.नं.१०५२ ची नोंद रद्द केल्याबाबतचा आदेश नं.२०७/२०१३ फेरीस्त नि.न.३७ सोबत दाखल केला आहे. सदर आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसते की वादीने दिनांक ०४/०३/२०१३ रोजी तहसिलदार जत यांचेकडे मृत्युपत्राची नोंद करणेबाबत केलेला अर्ज गावकामगार तलाठी रेवणाळ यांनी फे.नं.१०५२ ने मंजूर केला होता. सदरची नोंद ही वस्तुस्थिती लपवून बेकायदेशीररित्या मृत्युपत्र नोंदवून घेतले असून आरटीएस/एसजीएल/५२१/९५ प्रलंबित असून त्यामध्ये स्थगिती आहे. अशा निष्कर्षाने सदर फे.नं.१०५२ हा रद्द करणेत आला आहे. तसेच प्रतिवादी नं.१ ने याकामी नि.नं.५१ कडे दाखल केलेल्या रेदिमु नं.४०/८४ मधील निकालाच्या छायांकित प्रतीवरून प्रतिवादी नं.१ यास ३/२४ हिस्सा, मायाबाई हिला १/२४ हिस्सा व बयाबाईस ९/२४ हिस्सा जाहीर केल्याचे दिसून येते. प्रतिवादी नं.१ ने त्याच्या कब्जाबाबतच्या कथनाबाबत जर कब्जा दाखिवणारी काही कागदपत्रे दाखल केली असती तर त्याचे वरील म्हणणे गृहीत धरता आले असते. वरील दाखल पुराव्याचे आधारे प्रतिवादी नं.१ कडे दावा मिळकतीचा कब्जा असल्याचा निष्कर्ष प्रथमदर्शनी काढता येत नाही.

याउलट वादीने त्याच्या हकीकतीतील कथने शाबीत करणेकरीता नि.नं.४५ सोबत नि.नं.४६ कडे मा. तहसिलदार, जत यांचेकडील वाटप अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये बयाबाई, साळुबाई व माईबाई यांची नांवे आहेत. तसेच आबा आप्पा बंडगर, कामाबाई रामा गणाचारी, हौसाबाई बाबू खांडेकर, साळुबाई रामा मोटे, तानुबाई रंगा वाघमोडे, नर्मदा केराप्पा व्हनमाने

यांचे अंगठे आहेत. सदर अर्जाचे अवलोकन केले असता सदर अर्ज हा प्रथमदर्शनी सर्वानुमते दाखल केल्याचे दिसते. तसेच वादीने नि.नं.४५/२ कडे मा. तहसिलदार, जत यांनी वाटपाकामी पाठविलेली दि.२४/५/२००० रोजीची नोटीस दाखल केलेली आहे. तसेच नि.नं. ४५/३ कडे मा.तहसिलदार, जत यांचेसमोर वरील सर्व लोकांनी सर्वानुमते दिलेल्या जबाबाची सही शिक्याची नक्कल दाखल केलेली आहे. सदर नकलेचे अवलोकन केले असता सदर जबाबावरती वरील सर्व लोकांच्या अंगठे असल्याचे दिसून येते. तसेच सदर जबाबामध्ये दावा मिळकतीचे वरील सर्वांनी आपापसात सरस निरस मानाने वाटप करून घेतलेले आहे व त्याप्रमाणे प्रस्तूत जमीनीत त्यांच्या वहीवाटी आहेत असा जबाब नोंदविल्याचे दिसते. त्यानंतर मा. तहसिलदार, जत यांनी वाटप/एसआर/२७३/२००० मध्ये आदेश पारीत केल्याचे दिसते.

वादीने नि.नं.१२ ला दाखल वाटपपत्रावरून मायाबाई गणाचारी हिने तिचे वाटयास आलेल्या गट नं.७८३/३ मधील ३ हेक्टर १६ आर जमीन ही नोंदणीकृत वाटपपत्राने वादीस दिल्याचे प्रथमदर्शनी दिसते. नि.नं.१२ वरील वाटपपत्राचे अवलोकन केले असता *'सदर जमीन मेहनत मशागत व सुधारणा करणेसाठी आपापसात सरस निरस मानाने वाटप करून कब्जात घेतलेले आहे'* असे नमूद आहे. तसेच नि.नं.१३ ला दाखल बयाबाई बंडगर यांचे मृत्युपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये *'माझे पश्चात माझे नातूने (वादी) मिळकती कब्जात घेणेचे आहेत'* असे नमूद असल्याचे दिसून येते. यावरून त्यांनी त्यांचे हिश्यास आलेली गट नं.७८३/३ मधील १ हेक्टर जमीन वादीस दिल्याचे प्रथमदर्शनी दिसते. प्रतिवादी नं.१च्या म्हणणेनुसार सदरचे वाटपपत्र व मृत्युपत्र यांच्या नोंदीसंदर्भात त्यांनी अपिल केलेले असून सदर अपिल अद्याप प्रलंबित आहेत. परंतू सदरच्या नोंदी या बेकायदेशीर ठरविलेल्या आहेत, असा याक्षणी निष्कर्ष काढता येणार नाही.

रेदिमु नं.४०/८४ मधील निकालपत्र

प्रस्तुत  अर्जाकामी वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांपैकी वादीचा कब्जा दर्शविणारी कागदपत्रे सदर अर्ज गुणदोषावर ठरविणेकामी पाहणे गरजेचे आहे.

यावरुनही माझे मते वादी मनाई हुकूम मिळण्यास पात्र नाही.  वरील सर्व विवेचनावरून वादी हे प्रथमदर्शनी वाद मिळकत त्यांच्या ताब्यात आहे व दाव्याचा समतोलही त्यांच्या बाजूने आहे हे सिध्द करू शकले नाहीत. वर उल्लेख केल्याप्रमाणे वाद मिळकत ८ब ही कशी तयार झाली हे पाहता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही.  याउलट प्रतिवादी नं.१ यांचेच नुकसान होईल.  सबब या मुद्यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१.    अर्ज नामंजूर करण्यात येतो.

३.    अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत)

दि.०१.०२.२०१४<br>जत

**(शिरीषकुमार दि. वाघमारे)**<br>**सहदिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**<br>**जत, जि. सांगली.**